ePaper
शिवसेना कुणाची? ठाकरे की शिंदे? निवडणूक आयोगाने दिली पुढची तारीख




वर्ष - 6 । अंक - 276 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा मार्चमध्ये संपावर जाण्याचा इशारा
- संतपीठाचे स्नेहसंमेलन उत्साहात
- धनुष्यबाण कुणाचे ?


www.mahaenews.com | शनिवार, दि. 21जानेवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी आमनेसामने!

## चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक : भाजपाची खलबतं अन् राष्ट्रवादीचा ठराव

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।




**पिंपरी-चिंचवडमधील आगामी महापालिका, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीची 'लिटमस टेस्ट' समजली जणारी चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक प्रतिष्ठेची बनली असून, राज्यातील सत्ताधारी भाजपा विरुद्ध महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस असा सामना रंगणार आहे.**

चिंचवड विधानसभा मतदार संघाचे आमदार लक्ष्मण जगताप यांचे ३ जानेवारी २०२३ रोजी दुर्धर आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी अवघ्या १५ दिवसात अनपेक्षितपणे पोटनिवडणूक जाहीर झाली. २७ फेब्रुवारीला मतदान, तर २ मार्चला मतमोजणी होणार आहे. चिंचवडमध्ये ५ लाख ६६ हजार ४१५ मतदार आहेत. तर ३ लाख १ हजार ६४८ पुरुष, २ लाख ६४ हजार ७३२ महिला आणि ३५ इतर मतदार आहेत. हेच मतदार आता चिंचवडचा नवीन आमदार ठरविणार आहेत.

दरम्यान, पोटनिवडणुकीची घोषणा होताच महाविकास आघाडीतील इच्छुकांनी दंड थोपाटले आहेत. ही निवडणूक बिनविरोध व्हावी. याकरिता प्रयत्न सुरू असताना राष्ट्रवादीतून माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली आहे. दुसरीकडे, शिवसेनेचे माजी गटनेते राहुल कलाटे यांनीही मोर्चेबांधणी सुरू केली आहे.




### जगताप कुटुंबियांमध्ये दोन गट नाहीत...

» दुसरीकडे, दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप अश्विनी जगताप यांना उमेदवारी मिळाली. तर त्यांना सहानुभूती मिळेल. त्यांना उमेदवारी दिल्यास विरोधकही माघार घेवू शकतात. त्यामुळे निवडणूक बिनविरोध होईल. त्यासाठी त्यांनाच उमेदवारी द्यावी यासाठी एक गट आग्रही आहे, असा दावा केला जात आहे. तसेच, दुसऱ्या गटाकडून शंकर जगताप यांच्या उमेदवारीबाबत आग्रह धरला जात आहे. त्यामुळे भाजपात दोन गट निर्माण झाले आहेत, अशी चर्चा आहे. मात्र, भाजपात असा कोणताही गट-तट नाही. शंकर जगताप हेच भाजपाचे उमेदवार आहेत. त्यांच्या माध्यमातून निवडणूक झालीच, तर विजयश्री खेचून आणणार आहोत, असा निर्धार भाजपाच्या गोपनीय बैठकीत झाला आहे, असेही सूत्रांकडून समजले.

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा ठराव; 'घड्याळ' वरच निवडणूक लढवा!

चिंचवड मतदार संघातून राष्ट्रवादीच्या 'घड्याळ' चिन्हावर निवडणूक लढवावी आणि या मतदार संघात राष्ट्रवादीचा आमदार करण्याची संधी पक्षश्रेष्ठींनी सोडू नये, असा ठराव शहर पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केला आहे. पिंपरी-चिंचवड संपूर्ण शहरात कार्यकर्ते उत्साहात आहेत आणि नेतेमंडळी देखील आक्रमक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी 'एक्शन मोड'मध्ये असल्याने, ही निवडणूक घड्याळ याच चिन्हावर लढविण्यात यावी, अशी मागणी होत आहे. चिंचवड पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी पक्ष कार्यालयात महत्वपूर्ण बैठक झाली. यावेळी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, राष्ट्रवादी युवक कॅाग्रेसचे शहराध्यक्ष इम्रान शेख, महारष्ट्र राष्ट्रवादी विध्यार्थी कॅाग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे, माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, जेष्ठ नगरसवेक भाऊसाहेब भोईर आदी उपस्थित होते.

### महाविकास आघाडीत बंडखोरी?

» महाविकास आघाडीतील प्रमुख घटकपक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून माजी विरोधी पक्षनेते नाना काटे निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. दुसरीकडे, शिवसेनेचे माजी गटनेते राहुल कलाटे यांनीसुद्धा दंड थोपाटले आहेत. महाविकास आघाडीत कलाटे आणि काटे असे दोन गट होणार असून, ज्यांना तिकीट मिळणार नाही. ते अपक्ष निवडणूक लढणार हे निश्चित आहे. त्यामुळे महाविकास आघाडी पर्यायाने राष्ट्रवादी काँग्रेसला संभाव्य बंडखोरीचा धोका आहे. त्यामुळे राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

### ... असा राष्ट्रवादीचा प्रस्ताव

» पक्ष आणि संघटना म्हणून महाराष्ट्राच्या पुरोगामी मातीत फॅसिस्ट आणि धर्मवादी राजकारणाचे वादळ घोंगावत असताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पुरोगामित्वाची पताका कायम हातात ठेवून चाललेली आहे. आदरणीय फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार आपण पुढे घेऊन चाललेलो आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही खालील प्रस्ताव आपणासमोर ठेवत आहोत.

1. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने कोणत्याही परिस्थितीत ही जागा लढवावी.
2. ही जागा लढताना ती फक्त आणि फक्त घड्याळ ह्या चिन्हावराच लढावी.
3. उमेदवार हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षा कार्यरत असलेल्याच असावा. कारण मागील पाच वर्षांमध्ये पक्षाची खूप पडझड झाली आहे. या पडझडीमध्ये सुद्धा पक्षाचे काम करण्यासाठी आदरणीय पवार साहेब, आदरणीय अजितदादा आणि पुरोगामी विचार यांवर निष्ठा ठेऊन अत्यंत प्रतिकूल काळात पक्षासोबत जी लोक राहिली त्यातील व्यक्तीचा योग्य विचार व्हावा.निष्ठेचा आणि नियोजनपूर्वक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची ही संधी आपण सोडता कामा नये. जेणेकरून पक्षसंघटनेचा योग्य संदेश तळागाळापर्यंत जाईल. तसेच आगामी महापालिका निवडणुकीत आपल्याला निश्चितपणे फायदा होईल. म्हणून वरील प्रस्तावावर गांभीर्यपूर्वक विचार करून योग्य निर्णय घेण्यात यावा.

# राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा मार्चमध्ये संपावर जाण्याचा इशारा

## जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याची मागणी

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जुनी निवृत्तिवेतन योजना राज्याला दिवाळखोरीत ढकलेल अशी भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली होती. मात्र, राज्य सरकारचे कर्मचारी आक्रमक झाले असून ही योजना राज्यातही लागू करावी, या मागणीसाठी सरकारी कर्मचारी येत्या मार्चमध्ये संपावर जाणार असल्याची माहिती राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक व सल्लागार जी. डी. कुलथे यांनी दिली. केंद्र सरकारने ती आधी लागू केल्यास राज्यातही ती लागू होईल, असेही त्यांनी सांगितले.**




### थकबाकीचा हप्ता फेब्रुवारीच्या वेतनात

**वेतनातील त्रुटींबाबत बक्षी समितीचा खंड दोन लागू करण्याबाबत सरकारसोबत सकारात्मक चर्चा झाली. त्यातून २०० पैकी १०४ संवर्गातील त्रुटी दूर झाल्या आहेत. मात्र, त्याचा शासन निर्णय अद्याप आलेला नाही. तो लवकर काढावा. तसेच, जुलै २०२२ मध्ये केंद्र सरकारने दिलेला महागाई भत्ता राज्य सरकारनेही लागू केला. त्याचा सहा महिन्यांचा थकबाकीचा हप्ता फेब्रुवारीच्या वेतनात मिळणार असल्याचेही कुलथे यांनी सांगितले.**

महासंघाकडून आयोजित कृषी अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या चर्चेनंतर पुण्यात पत्रकारांशी बोलताना कुलथे यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, 'राजस्थान, छत्तीसगड, पंजाब, झारखंड आणि हिमाचल प्रदेशात जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातही ही योजना लागू करावी. नव्या निवृत्ती योजनेची सदोष अंमलबजावणी तसेच गुंतवणूक, परतावा यांबाबत अविश्वासार्हता यामुळे अधिकारी, कर्मचारी संभ्रमावस्थेत आहेत. त्यामुळे वस्तुस्थितीचा अभ्यास करून ही योजना लागू करावी. तसा अहवाल केंद्र सरकारला द्यावा, जेणेकरून केंद्र सरकार यावर सकारात्मक निर्णय घेईल. केंद्रातच लागू झाल्यानंतर ही योजना राज्यातही लागू होईल. केवळ महाराष्ट्र, गुजरात आणि केरळमध्ये निवृत्तीचे वय ५८ आहे. त्यामुळे राज्यात सरकारी कर्मचाऱ्यांसाठी निवृत्तीचे वय ५८ वरून ६० करावे याचाही पाठपुरावा सुरू आहे.

दरम्यान, महासंघाकडून मुंबईत ८६ हजार चौरस फुटांवर अधिकारी कल्याण केंद्र उभारण्यात येत आहे. त्याचे काम फेब्रुवारीत सुरू होईल. यासाठी ६० कोटींचा खर्च अपेक्षित असून सरकारकडून आतापर्यंत दहा कोटींचा निधी मिळाला आहे. कर्मचाऱ्यांनी वर्गणीतून दहा कोटी जमवले आहेत. आणखी १५ कोटी जमविण्यात येणार आहेत. तसेच राज्य सरकारकडूनही आणखी १५ कोटींचा निधी मिळण्याची अपेक्षा आहे, अशी माहिती महासंघाचे सल्लागार विनायक लहाडे यांनी सांगितले. सुदाम टाव्हरे, नितीन काळे, अनंत कटके, प्रीती हिरळकर या वेळी उपस्थित होते.

# शरद पवार – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकाच व्यासपीठावर?

## वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची 46 वी वार्षिक सर्वसाधारण

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार आणि राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शनिवारी एकाच व्यासपीठावर असणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील बदलत्या राजकीय परिस्थितीत दोघे नेते एकत्र येणार असल्याने ते काय बोलणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी सकाळी अकरा वाजता संस्थेच्या मांजरी बुद्रुक येथील कार्यालयात होणार आहे. माजी केंद्रीय कृषी मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष शरद पवार सभेच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. या सभेसाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. त्यांच्याबरोबर सहकारमंत्री अतुल सावे, विरोधी पक्षनेते अजित पवार, संस्थेचे उपाध्यक्ष आणि माजी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, संस्थेचे विश्वस्त आणि नियामक मंडळाचे सदस्य, संबंधित खात्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबरच साखर उद्योगातील तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वतीने साखर उद्योगातील सर्वोत्कृष्ट कार्यक्षमतेसाठी दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरणही यावेळी करण्यात येणार आहे.



# कात्रज चौकाला वाहतूक कोंडी नित्याचीच!

## चौकात चालू असलेले उड्डाणपुलाचे काम, मोठ्या प्रमाणांवर होणारी अवजड वाहतूक कोंडीची मुख्य कारणे

। कात्रज । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कात्रज चौकात वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब झाली आहे. मात्र, यामध्ये बेजबाबदार वानचालकांमुळे भर पडत आहे. त्याचबरोबर चौकात चालू असलेले उड्डाणपुलाचे काम आणि मोठ्या प्रमाणांवर होणारी अवजड वाहतूक ही वाहतूक कोंडीची मुख्य कारणे आहेत. त्याचबरोबर वाहतूक पोलिसांकडून हवा तसा प्रतिसाद मिळत नसून तेच हतबल असल्याचे दिसत आहे.**

कात्रज चौकातील कोंडी कोंढवा रस्त्यांवरील राजस चौकापर्यंत, सातारा रस्त्यांवर भारती विद्यापीठापासून गुजरवाडी फाट्यापर्यंत तर मुंबई महामार्गावर नवले पुलापर्यंत असल्याचे दिसून येते. यावेळी अनेकदा राजस चौकात पोलिस असतात मात्र, ते कोंढवा रस्त्यांवरून कात्रज चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर थांबून राहतात. मात्र, कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

त्याचबरोबर चौकात मोठ्या प्रमाणात असणाऱ्या पीएमपीएलच्या बसेसही वाहतूक कोंडीसाठी कारणीभूत ठरत आहेत. चौकात होणाऱ्या कोंडीमुळे पीएमपीएमएल आगाराकडून येणाऱ्या बसेसना गुजरवाडी बस स्थानकावरून



वळवून कात्रज बसथांब्यावर आणण्याचा आदेश आहे. मात्र, पीएमपीएमएल चालकांकडून अनेकवेळा याला केराची टोपली दाखवण्यात येत आहे.

कात्रज चौकात रिक्षा, बसदेखील थांबत असतात त्यामुळे प्रवासी मोठ्या प्रमाणात या चौकात गर्दी करतात. त्याचबरोबर, उजवीकडे बसेस व अवजड

> **कात्रज चौकातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आमच्याकडून सातत्याने प्रयत्न सुरु असतात. मात्र मोठ्या प्रमाणात असणाऱ्या पीएमपीएलच्या बसगाड्या आणि अवजड वाहतूक यांच्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. त्याचबरोबर चौकात उड्डाणपुलाचे सुरु असलेले काम वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरत आहे.**
> - प्रशांत कणसे, सहाय्यक पोलिस निरिक्षक, भारती विद्यापीठ

वाहनांना वळण्यास बंदी असताना त्याचेही पालन होताना दिसत नाही. परिणामी मोठ्या प्रमाणांवर वाहतूक कोंडी होते आणि दोनशे मीटर अंतर पार करण्यासाठी वाहनचालकांना अर्ध्या तासापेक्षा जास्त कालावधी मोजावा लागतो. कोंढवा रस्ता, सातारा रस्ता, नवले पूल आणि पुणे शहरातून एकाच वेळी येणाऱ्या वाहनांमुळे प्रचंड वाहतूक कोंडी होते.

यामध्ये सकाळी आणि संध्याकाळच्यावेळी अधिकची भर पडते. दत्तनगर ते कात्रज चौक मार्गावर वाहतूक कोंडीची हीच परिस्थिती असते.

या मार्गावर अवजड वाहनांना बंदी असताना वाहतूक पोलिसांकडून सर्सास दुर्लक्ष होताना दिसत आहे. या मार्गावर सर्सास अवजड वाहतूक सुरु असल्याने वाहतूक कोंडीत भर पडत असते. याचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागतो.

# संतपीठाचे स्नेहसंमेलन उत्साहात!

## » विद्यार्थ्यांचे बहारदार सादरीकरण : आमदार महेश लांडगे यांची उपस्थिती

पिंपरी । महाईन्यूज ।



**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचलित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेज टाळगाव चिखली शाळेचा प्रथम वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम दोन सत्रात आचार्य अत्रे रंगमंदिर, पिंपरी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. संतपीठाच्या प्रथम वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमामध्ये पहिल्या सत्रातील कार्यक्रमासाठी माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, दिनेश यादव व संतोष मोरे, ह.भ.प. माऊली महाराज साळुंखे, संतपीठ - चिंतन समिती सदस्य प्रकाश आबा आहेर, सामाजिक कार्यकर्ते किसन बावकर, विनायक मोरे, जितु यादव व इतर शाळेतील प्राचार्य प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.**

दुसऱ्या सत्रामध्ये आमदार महेश लांडगे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, उपायुक्त शिक्षण विभाग संदीप खोत, शिक्षणाधिकारी माध्यमिक तथा संतपीठ सचिव संजय नाईकडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी पर्यवेक्षक विलास पाटील, कार्यालयीन अधीक्षक रोहिदास शेटे, संतपीठ अभ्यासक ज्ञानेश्वर गाडगे, तसेच सामाजिक कार्यकर्ते विकास साने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करून उपस्थित मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला .

मा.आमदार महेश दादा लांडगे यांनी आपल्या भाषणामध्ये चिखली गावाचा विकास आणि संतपीठ याबद्दल अधिक विशेष सहकार्याचे आश्वासन दिले व ते साकारण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत असे आपल्या भाषणातून व्यक्त केले. तसेच अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी ही प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना संतपीठ शाळेतील अभिवादनाच्या !! राम कृष्ण हरी!! या प्राचार्या डॉ.मृदुला महाजन यांनी सुरू केलेल्या सुंदर संकल्पनेचे विशेष कौतुक केले आणि कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.



### गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव...

» संतपीठ सचिव संजय नाईकडे यांनी संतपीठ हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचालित स्वयं अर्थसहाय्य तत्वावर आधारित असून त्याबाबत अधिक माहिती दिली. संचालक श्री राजु महाराज ढोरे, संचालिका डॉ. स्वाती मुळे यांनी संस्थेचा ध्येय धोरणाची आणि कार्यपद्धतीची माहिती दिली. प्राचार्या डॉ. मृदुला महाजन यांनी वार्षिक अहवाल सादर केला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संतपीठातील गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस व प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करण्यात आला.



### 'टाळगाव चिखली' नाटिकेचे सादरीकरण...

» सांस्कृतिक कार्यक्रमात पुर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'महाराष्ट्राची लोकधारा' या संकल्पनेअंतर्गत गणेश वंदना, शिव राज्याभिषेक सोहळा, कोळी नृत्य, गोंधळ गीत तर प्राथमिक विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी 'लोकल टू ग्लोबल' या संकल्पने अंतर्गत टाळगाव चिखली या गावाचा इतिहास सांगणारी 'टाळगाव चिखली' ही नाटिका, आणि यांसारख्या विविध नृत्य, नाटक, गायन, वादन तसेच विविध कलागुणांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी या प्रसंगी केले.चिमुकल्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांनी आपापल्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण करून पालकांची मने प्रफुल्लित केली.

# कचरा खतनिर्मिती, पुर्नवापर प्रदर्शनाचा लाभ घ्या!

## » अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील : घनकचरा विषयक प्रदर्शनात विविध कंपन्यांचा सहभाग

।पिंपरी-चिंचवड ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।



कचऱ्यापासून खत निर्मिती, ई वेस्ट आणि कच-याचा पुनर्वापर याविषयी सविस्तर माहिती देणारे प्रदर्शन महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आले असून त्याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चिंचवड येथील ऑटो क्लस्टर २० ते २२ जानेवारी या कालावधीत घनकचरा विषयक सविस्तर माहिती देणारे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी जांभळे पाटील यांनी प्रदर्शनाच्या स्टॉल्सला भेट देऊन पाहणी केली.

प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, उप आयुक्त अजय चारठणकर, मनोज लोणकर, रविकिरण घोडके, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अण्णा बोदडे, उमाकांत गायकवाड, शितल वाकडे, विजयकुमार थोरात, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, जनसंपर्क विभागाचे प्रफुल्ल पुराणिक, क्षेत्रिय कार्यालयातील सर्व सहाय्यक आरोग्याधिकारी, बिल्डर असोसिएशनचे संजीवन सांगळे, दत्तात्रय देशमुख, व्ही एम संस्थेचे संचालक जितेंद्र पाटील, युनिट्रेक मीडियाचे व्यवस्थापक प्रशांत घाडगे, प्रतिभा घाडगे, कविता पवार, विक्रम वारणकर पर्यावरण विभागाच्या उपअभियंता सोहन निकम, मोराणकर तसेच विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी प्रतिनिधी नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर प्रदर्शनात महानगरपालिकेचे तसेच जेईनम फुड ऍन्ड वेस्ट प्रोजेक्ट प्रा. लि., विनटेक स्क्वेअर प्रा.लि., इनरिच टेक, ग्रीनेरीया रिन्युएबल टेक्नॉलॉजीस, कन्सेप्ट बायोटेक, सिरीअस इन्व्हायरोन्स एलएलपी, देव बायोफयुअल, बायोगॅस, फिनटेक लाईफ टु टेक्नॉलॉजीस प्रा.लि., अर्थकेअर इक्वीपमेंट प्रा. लि, इन्व्हीकेअर टेक्नॉलॉजीस प्रा. लि., श्रीजी एक्वा ट्रीटमेंट प्रा. लि. कला जनसेट प्रा. लि., लिमरस सस्टेनेबल सोल्युशन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका एसटीपी आणि आरोग्य व स्वच्छ भारत अभियान कक्ष, व्ही. क्वालिटी इलेक्ट्रोमेक प्रा. लि., पिसिसीआयसीएसए, रेडडो नेच्युरा इंडिया प्रा. लि., फयुराट वुलार हायड्रोटेक एलएलपी, जलसेवक सोल्युशन्स, इन्फीनिटी हायड्रोलिक्स, चक्र आकार लाईफस्टाईल सोल्युशन्स, एचएनबी इंजिनिअर्स पीटी लि., स्मार्ट एन्व्हायरो सिस्टम प्रा. लि., साईरुपम टेक्नॉलॉजिस, सॉल्व्हअर्थ इकोटेक प्रा. लि., ग्रीन सृष्टी फाउंडेशन, मेडा, पुणे डिस्ट्रीक्ट हाऊसिंग फेडरेशन, सायनर्जी मेटेरिया, इकोसेन्स ग्रीन सोल्युशन्स एलएलपी, क्लीन ओ अर्थ, पुर्णम इकोव्हीजन फाऊंडेशन, संजिवनी डिजास्टर सोल्युशन्स, कॉन्टीप्रो इंडस्ट्रीज या संस्थांचे माहिती व प्रात्यक्षिक सादर करणारे स्टॉल आहेत.

## संपादकीय »

# आर्थिक विकासाचे इंजिन की अडथळा?

*भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश बनत आहे. त्या पार्श्वभूमीवर देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण अशा मानवी भांडवल आणि लोकसंख्या लाभांशाच्या विविध पैलूंचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. त्याचा पुरेपूर वापर केला, तर देश प्रगतिपथावर वेगाने धावू शकेल.*

सध्या लोकसंख्येमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेला भारत २०२३ या वर्षात लवकरच चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश होईल, असा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) व्यक्त केला आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगात सातव्या क्रमांकावर असलेला भारत लोकसंख्येमध्ये पहिल्या क्रमांकावर पोहचत असताना देशातील संसाधने आणि वाढत्या लोकसंख्येचे योग्य नियोजन करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

एकीकडे वेगाने वाढणारी लोकसंख्या आर्थिक विकासातील अडथळा मानला जात असली तरी, थिओडेर शुल्झसारख्या अर्थतज्ज्ञाने लोकसंख्येला मानवी भांडवल संबोधून दर्जेदार शिक्षण, प्रशिक्षण आणि आरोग्य सुविधा यांद्वारे देशातील लोकांची मानसिकता विकासाच्या दिशेने प्रेरित केल्यास देशाचा जलद आर्थिक विकास होऊ शकतो, असे मत मांडले आहे.

तर डेव्हिड ब्लुम आणि डेव्हिड कनिंग यांनी लोकसंख्येच्या सहाय्याने देशाला लोकसंख्या लाभांश कसे प्राप्त करता येतात, याचे विश्लेषण केले आहे. त्यांनी लोकसंख्येची वयोरचना लक्षात घेऊन दर्जेदार शिक्षण, प्रशिक्षण आणि आरोग्य सुविधांची मुबलक उपलब्धता करून दिल्यास श्रमिकांची उत्पादकता वाढून आर्थिक वृद्धी दर वाढतो हे स्पष्ट केले आहे.चीनसारख्या महाकाय लोकसंख्येच्या देशाने मानवी भांडवलाचा नियोजित आणि शिस्तबद्ध विकास करत उच्च लोकसंख्या लाभांश संपादित करण्याचे व जागतिक बाजारपेठेवर वर्चस्व निर्माण करण्याचे यशस्वी प्रयत्न केले आहेत. आज भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा आणि पर्यायाने सर्वाधिक मानवी संसाधनांचा देश बनत असताना आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण अशा मानवी भांडवल आणि लोकसंख्या लाभांशाच्या विविध पैलूंचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

मानवी भांडवल आणि लोकसंख्या लाभांश यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या लोकसंख्येच्या वयरचनेचा विचार करता, भारतातील एकूण लोकसंख्येत कार्यकारी लोकसंख्या मानल्या जाणाऱ्या १५ ते ६४ वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण ६७ टक्क्यांवर आहे. अधिक श्रम उत्पादकतेच्या माध्यमातून देशाला अधिक लोकसंख्या लाभांश प्राप्त करण्यासाठी अनुकूल स्थिती असल्याचे स्पष्ट होते.

# पतंगबाजीचा निर्व्याज खेळ महत्त्वाकांक्षेमुळे राक्षसी ठरतोय...






निर्भेळ आनंदाचे रूपांतर दारुण दु:खात करण्याची आपल्या समाजाची ताकद किती अफाट आहे, याचे दर्शन दोन दिवसांपूर्वी पतंगांच्या मांजाने घेतलेल्या बळींमधून समोर आले. या बळींची संख्या महाराष्ट्रात दोन आहे तर गुजरातमध्ये तिप्पट- म्हणजे सहा. उदारीकरणाबरोबर शहरांतून उत्तरोत्तर पतंगांचा खेळ हद्दपार होण्याची आणि हा खेळ बदनाम होण्याची जी जी प्रमुख कारणे आहेत, त्यात नायलॉन मांजाचा क्रम सर्वात वरचा आहे. नव्वदच्या दशकात धारदार काचांचा आपापला मांजा बनविणारे पतंगबाज देशभर होते. बरेली या उत्तर प्रदेशातील शहरातून येणारा मांजा गेली कित्येक वर्षे पतंगांचे पेज लढविण्यासाठी सर्व राज्यांत पोहोचत होता. डोंगरीचा तार (तारी) मांजा हादेखील पतंग उडविणाऱ्यांना हवाहवासा वाटणारा. बरेलीचा काळा, वांगी रंगाचा, बारीक गुलाबी किंवा 'कवटी' मांजाधारक इतर मांजा वापरणाऱ्यांना स्पर्धेत मागे टाकत. या मांजांची गुणवत्ता, खर आणि धार या सर्वोत्तम असत पण त्यांचा उपद्रव ना पक्ष्यांना होई ना माणसे जखमी होण्याइतकी त्याची दहशत दिसे. उलट पतंग बदवणाऱ्याच्या, उडवणाऱ्याच्या बोटांवर त्या धारदारपणाचा प्रसाद उरे. सन दोन हजारोत्तर काळामध्ये पतंगबाजीत जो मोठा बदल घडला, त्यात दुसऱ्यावर कुरघोडी करण्यासाठी नायलॉन वा चिनी मांजा आणून पतंग उडविण्याचा. खरेतर ही पारंपरिक पतंगबाजी नव्हती. काच लावून बनविलेला कितीही ताकदीचा, उत्तम मसाल्याचा मांजा या चिनी मांजापुढे निष्प्रभ ठरत होता. पतंग उडविण्यासाठी, दुसऱ्याची पतंग कापण्यासाठी घशिटण्याची- ढील देण्याची विशिष्ट कला खेळाडूच्या अंगी असावी लागायची. केवळ त्या बळावर मांजा कोणताही असला, तरी हवेच्या स्थितीनुसार- पतंगबाजाच्या अनुभवानुसार निष्णात पतंगबाज इतरांच्या पतंगाला कापण्याची कला दाखवत असे. वरून पेज लावताना किंचितही न थांबता ढील देण्याचा प्रकार आणि प्रतिस्पर्ध्याची घशिटताना अधिक बदवून पुरेशी हापसण्याची स्थिती आकाशात तयार करण्याचा प्रकार पारंगत खेळाडू करत असे. पण पतंगीतल्या या सगळ्या कलाबाज्या नायलॉन मांजाने क्षणार्धात नष्ट केल्या. कारण हवेचे भान नसले-पतंग जुजबी उडवता आली तरी नवखा, अगदी लहान खेळाडूही चिनी मांजाद्वारे पारंगत पतंगबाजाला नामोहरम करण्यासाठी सक्षम ठरत असे.नव्वदच्या दशकाच्या शेवटापर्यंत चिनी मांजा हा शंभरातील एखादा पतंग उत्साही वापरे. कारण त्या मांजाचा दर हा बरेली आणि डोंगरी मांजाहून चार ते पाच पट इतका होता. श्रीमंत आणि उच्चभ्रू वर्गातील पतंगबाजांचीच तो मांजा घेण्याची ऐपत होती. आताही त्यावर देशभरात बंदी असली, तरी निषिद्ध ठरविलेल्या ज्या ज्या गोष्टी आडमार्गाने मिळतात, तसा नायलॉन मांजाही उपलब्ध होतो. हा मांजा गुपचूप घेणारे, त्याच्या फिरक्या वापरणारे हेदेखील व्यापारी समाजातलेच अधिक. या मांजामुळे पक्ष्यांना, माणसांना, रस्त्यावर वाहन चालविणाऱ्यांना इजा होऊ शकते, याबद्दल कितीही जनजागृती झाली असली, तरी तो विचार लाथाडून केवळ पतंगबाजीत दुसऱ्यावर कुरघोडी करण्याची वृत्ती वाढत चालली आहे. छुप्या नायलॉन मांजांच्या साठ्यांवर कितीही कारवाई केली जात असली, तरी कितीही किंमत देऊन तो खरेदी करण्याची इच्छा दाखविणाऱ्यांमुळे सिनेमा पायरसीसारखा नायलॉन मांजाचा उद्योग फोफावला आहे. २००५ पासून हा मांजा मोठ्या प्रमाणावर वापरायला सुरुवात झाली. गुजरातचा पतंग महोत्सव बातम्यांचा विषय व्हायला लागला तेव्हापासून आणि तिथल्या पतंग उद्योगाने मूळच्या बरेलीमधील व्यवसायाला टक्कर द्यायला सुरुवात केली, तेव्हापासून हा मांजा देशात अधिकाधिक दिसायला लागला. या मांजाने घायाळ केलेल्या प्राणी-पक्ष्यांच्या छब्या वृत्तदळण करणाऱ्या दृक्-श्राव्य माध्यमांनी याच काळापासून दाखवायला सुरुवात केली. पतंग उडविण्याची एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित व्हायची परंपरा खेळात शिरलेल्या या अपायकारक घटकाने पूर्णपणे थांबविली.

# घरात अंधार; पाहुण्यांना पायघड्या

**आधी सरकारने भारतीय विद्यापीठांच्या विकासाकडे लक्ष द्यावे. नंतरच परदेशी विद्यापीठांना देशात परवानगी द्यावी. केवळ परदेशी विद्यापीठ बोलवून शिक्षण क्षेत्राचे खासगीकरण वाढवून सरकार आपल्या जवाबदारीपासून पळून जाऊ शकत नाही...**

शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) चा मसुदा तयार करण्यात आला. उच्च शिक्षणाचा स्तर सुधारण्यासाठी एनईपीने केलेल्या सूचनांपैकी एक म्हणजे परदेशी विद्यापीठांना भारतात संकुल स्थापनेची अनुमती. पाच जानेवारीला विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष एम. जगदेश कुमार यांनी हे जाहीर केले. यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत असताना प्रस्तावित धोरणात त्याचे फायदे आणि संभाव्य उणिवांबाबत सूक्ष्म चर्चा आवश्यक आहे. एम. जगदेश कुमार ह्यांनी ह्या धोरणाचे काही निकष सांगितले. त्यामध्ये पहिला निकष म्हणजे ज्या परदेशी उच्च शैक्षणिक संस्थाना भारतात संकुल उभारायचे आहे, त्या जागतिक क्रमवारीत सर्वोच्च ५०० विद्यापीठांत हव्यात किंवा नामांकित असाव्यात. परदेशी विद्यापीठे ही भारत सरकारच्या अनुदानित संस्था नसल्यामुळे त्यांची प्रवेश प्रक्रिया, शुल्क संरचना ठरवण्यात यूजीसीची कोणतीही भूमिका नसेल. या विद्यापीठांच्या कॅम्पसमध्ये आरक्षणाबाबत तेच ठरवतील. मूल्यमापन



प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांच्या गरजांचे मूल्यांकन केल्यानंतर, अर्थदुर्बलांसाठी शिष्यवृत्ती असू शकते. विद्यापीठांना केवळ कॅम्पसमध्येच प्रत्यक्ष वर्गासाठी पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकवण्याची परवानगी असेल. ऑनलाइन किंवा दूरस्थ नव्हे. शिक्षणाचा दर्जा इथे व मूळ संकुलात समान असावा लागेल. या साऱ्या अटी असतील.

या निर्णयाचे महत्त्वपूर्ण फायदे आहेत, असे अनेकांना वाटते. पहिला फायदा म्हणजे विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या. भारतात विद्यार्थ्यांची संख्या अंदाजे ३१ कोटी ५० लक्ष आहे (जनगणना २०११). भारतात ९९० विद्यापीठे आणि ४० हजार महाविद्यालये आहेत. परंतु उच्च शिक्षणात भारतातील विद्यार्थ्यांचे नोंदणी प्रमाण २६.३ टक्के आहे. चीनचे ५१, ब्राझीलचे ५० किंवा युरोपीय व उत्तर अमेरिकन राष्ट्रांत ८० टक्के आहे. उच्च शिक्षण संस्थांमधील ४७ टक्के पदवीधरच हे रोजगारक्षम आहेत. सध्याच्या शिक्षणाची गुणवत्ता अपुरी आहे. त्यामुळे परदेशी विद्यापीठांनी दर्जेदार शिक्षण द्यावे व तरुणांचे रूपांतर मानवी संसाधनात करावे. यातला आणखी एक घटक म्हणजे देशात प्रवेशयोग्य दर्जेदार शिक्षणाचा अभाव. क्वाक्वेरेली सायमंड्स (क्यूएस) वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगनुसार पहिल्या ५० मध्ये चीनमधील तीन विद्यापीठे आहेत, तर एकाही भारतीय विद्यापीठ पहिल्या शंभरात नाही. म्हणूनच सध्या १८ लाख भारतीय विद्यार्थी परदेशात शिकत आहेत. २०२२ या एका वर्षात साडेचार लाख विद्यार्थी परदेशात गेले. भारतातील परदेशी विद्यापीठांची संकुले ७.५ अब्ज डॉलर्सचा 'ब्रेन ड्रेन' थांबवतील. परदेशी विद्यापीठांच्या प्रवेशामुळे परकीय चलनाचा प्रवाह रोखला जाईल आणि आपल्याला परकीय भांडवलाचा साठा प्रभावीपणे वापरता येईल. दर्जेदार शिक्षणाचे प्रमाण वाढेल.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# धनुष्यबाण कुणाचे ?




## ठाकरे की शिंदे? निवडणूक आयोगाने दिली पुढची तारीख

### आता द्यावं लागणार लेखी उत्तर!

। मुंबई । महाईन्यूज ।

**शिवसेना पक्षाच्या नावावर आणि चिन्हावर कोणाचा अधिकार आहे? याप्रकरणी आज (शुक्रवार, २० जानेवारी) केंद्रीय निवडणूक आयोगासमोर महत्वाची सुनावणी पार पडली.**

जवळपास साडेतीन तासांपासून निवडणूक आयोगासमोर ठाकरे आणि शिंदे गटाकडून युक्तीवाद सुरू होता. दोन्ही गटाच्या वकिलांकडून जोरदार युक्तीवाद करण्यातआला. दोन्ही गटांनी 'शिवसेना' पक्षाचं नाव आणि 'धनुष्यबाण' पक्ष चिन्हावर दावा सांगितला आहे. निवडणूक आयोगासमोरील युक्तीवाद अंतिम टप्प्यात आला असला तरी मूळ शिवसेना कुणाची आणि धनुष्यबाण कोणला द्यायचा? याबाबतचा सस्पेन्स कायम आहे.

सोमवारी (३० जानेवारी रोजी) याबाबत लेखी उत्तर दाखल करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. दोन्ही गटांनी लेखी उत्तर दाखल केल्यानंतर पुढील सुनावणी होणार आहे. विशेष म्हणजे २३ जानेवारी रोजी उद्धव ठाकरे यांचा पक्षप्रमुख पदाचा कार्यकाल संपणार आहे. त्यामुळे मूळ शिवसेना नेमकी कुणाची हा पेच आणखी वाढण्याची शक्यता आहे. यापूर्वी १७ जानेवारीला सुनावणी झाली होती. ठाकरे गटाच्या वतीने आज ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. तसेच शिंदे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील महेश जेठमलानी यांनी युक्तिवाद केला. कपिल सिब्बल यांनी ठाकरे गटाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापूर्वी आपला निर्णय देऊ नये, असे आवाहन केले होते.

दरम्यान यावर काय निर्णय होणार हे पाहावे लागणार आहे. गेल्या सुनावणीत झालेला युक्तिवाद महत्वाचा होता. आज कोर्टाने निर्णय तर तो त्या सुनावणीवर अवलंबून राहील.

#### शिंदे गटाचा युक्तिवाद -

१) आमच्याकडे संख्याबळ जास्त आहे त्यामुळे चिन्हाचा निर्यण तातडीने घ्यावा.

२) पक्षाचा मोठा गट लोकप्रतिनिधींसोबत बाहेर पडल्यास तो बेकायदेशीर कसा?

३) शिंदे गटाच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्याचे ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल म्हणाले होते. दरम्यान, महेश जेठमलानी यांनी हा दावा फेटाळला आहे. कागदपत्रांमध्ये कुठलीही त्रुटी नसल्याचे जेठमलानी यांनी स्पष्ट केले. तसेच आमदार आणि खासदार यांचं बहुमत शिंदे गटाकडे असल्याचा दावा त्यांनी केला.

#### ठाकरे गटाचा युक्तिवाद

१) शिवसेनेतला कोणतागी गट नाही तर कपोकल्पित आहे. शिवसेनेतील फूट म्हणजे कल्पना आहे.
२) शिवसेनेत दाखवलेल्या फुटीला काहीही अस्तित्व नाही. उद्धव ठाकरे यांची शिवसेना खरी शिवसेना आहे. शिवसेनेतील फूट आयोगाने ग्राह्य धरु नये.
३) शिंदे गटाने दाखल केलेली कागदपत्रं बोगस आहेत. या कागदपत्रांमध्ये त्रुटी आहेत. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयापर्यंत प्रतिक्षा करा.तसेच काही लोकांनी पक्षातून बाहेर पडणे हे बेकायदेशीर आहे.
४) शिंदे गटाची कागपत्र खरी असतील तर ओळख परेड करा, अशी महत्वाची मागणी कपील सिब्बल यांनी केली. लोकप्रतिनिधी आणि पक्ष वेगळा आहे. आमदार, खासदार पक्षाच्या चिन्हावर निवडून आले आहेत. त्यामुळे आधी कोर्टाचा निर्णय येऊ द्या.
५) पक्षात होता तेव्हा आक्षेप का घेतला नाही. पक्षाचा लाभ घेतला आणि परत लोकशाही नाही असे म्हणता. पक्षाच्या धोरणांना माणूनच मतदार मतदान करत असतात. सर्व आमदार, खासदार शिवसेनेच्या धनुष्यबाण या चिन्हावर निवडून आले आहेत.
६) आतापर्यंत उमेदवारांना एबी फॉर्म दिला जात होता. मग आता आक्षेप का? तसेच पक्षाअंतर्गत निवडणुका घेण्यास मुदतवाढ द्या, अशी मागणी देखील कपिल सिब्बल यांनी केली आहे. उद्धव ठाकरे यांची २३ जानेवारीला पक्षप्रमुख मुदत संपत आहे.

# पाटण तालुक्यातील प्राथमिक शाळा पाडळोशी येथे बालबाजारास उत्स्फूर्त प्रतिसाद

## पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग

### शिक्षक, पालक, ग्रामस्थांनी लुटला खरेदीचा आनंद

। पाटण (सातारा)
। कांचन सुतार । महाईन्यूज ।

**येथील जि. प. प्राथमिक शाळा पाडळोशी येथे विविध शालेय उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या कल्पनांच्या पंखांना बळ देण्यासाठी तसेच सामाजिक जाणिव दृढ करण्यासाठी बालबाजाराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमास ग्रामस्थांसह, पालक-शिक्षक वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पहिली ते सातवीच्या विद्यार्थांनी या बालबाजरामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला. विशेष बाब म्हणजे या बालबाजारात भाजीपाल्यासह विविध वस्तू, खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवण्यात आले होत्या. या वस्तूंची खरेदी करण्यासाठी शिक्षक, पालकांसह ग्रामस्थांची झुंबड उडाल्याचे पहायला मिळाले.**

मंगळवारी, (दि. 17 जानेवारी) रोजी पाडळोशी गावच्या मध्यवर्ती ठिकाणी हा बालबाजार भरविण्यात आला. हा बाजार पाहण्यासाठी पाडळोशी गावाशेजारील विविध गावातील प्राथमिक शाळांनी हजेरी लावली. यामध्ये प्राथमिक शाळा धायटी, प्राथमिक शाळा नारळवाडी, प्राथमिक शाळा तावरेवाडी, तसेच अंगणवाडी शाळांनी उपस्थिती दर्शविली. या शाळांतील चिमुकल्यांनी तसेच शिक्षकवृंदांनी खरेदीचा आनंद लुटला.

पाडळोशी गावच्या नवनिर्वाचित सरपंच अलकाताई तावरे यांनी या बालबाजारास सदिच्छा भेट दिली. शाळेच्या उपक्रमाबाबत विद्यार्थ्यांचे कौतुकोद्गार काढले. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा, सदस्या तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती जगदाळे मॅडम यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी शिक्षकवृंद उपस्थित होता..



> **जि. प. प्राथमिक शाळा पाडळोशीच्या वतीने राबविण्यात आलेला हा नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनांना तसेच भावविश्वाला निश्चितच बळ देणारा ठरणार आहे. समाजभान जपताना, ग्रामस्थ तसेच गावाप्रती असलेली जाणिव यातून विद्यार्थ्यांना दैनदिन, व्यवहारी जीवनात उपयोगी पडणार आहे. हा उपक्रम राबविणार्या सर्व शिक्षकवृंदांचे अभिनंदन आणि कौतुक.**
>
> -अलकाताई तावरे,
> नवनिर्वाचित सरपंच, पाडळोशी, ता. पाटण



# राजकारणात काहीही शक्य!

। मुंबई । महाईन्यूज ।

शिवसेना खासदार संजय राऊत सध्या काँग्रेसच्या भारत जोडो यात्रेत सहभागी झाले आहेत. राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा सध्या जम्मू -कश्मिरमध्ये आहे. यात्रेतून संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. महाविकास आघाडी स्थापन होऊ शकते. एकनाथ शिंदे भाजपसोबत सरकार स्थापन करुन शकतात. तर महाराष्ट्राच्या राजकारणात सर्व शक्य आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. त्यामुळे २०२४ ला उद्धव ठाकरे यांची शिवसेना भाजप सोबत जाईल का?, असा प्रश्न संजय राऊत यांना विचारण्यात आला.

संजय राऊत म्हणाले, "असे भाकितं वर्तवली, कोणी काही बोललं तरी माझा या सर्व भविष्यावर या क्षणी विश्वास नाही. काल नरेंद्र मोदी आले होते. ज्या भाजपने आमची शिवसेना फोडली अन् त्या फुटीचे समर्थन करत आहेत. ज्यांना भाजपने मांडीवर घेतले आहे. ज्यांनी बाळासाहेबांच्या पक्षाचे, चिन्हाचे नाव नष्ट करण्याचा अफजलखानी विडा उचलला आहे, असे मोदींच्या व्यासपिठावर होते. तर अशा लोकांबरोबर आम्ही पुन्हा जावं असा प्रश्न कसा पडू शकतो. हा आमच्या अस्मितेचा आणि भावनेचा प्रश्न आहे."होते. भाजपच्या कार्यकर्त्यांनी एक प्रकारे आजच्या सभेच्या निमित्ताने शक्ती प्रदर्शानासाठी मोठी गर्दी केली होती.

# प्रजासत्ताक दिनी कर्तव्य पथावरील संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ!

## ‘महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठे आणि स्त्रीशक्ती जागर’ चित्ररथावर साकारण्याचे काम युद्धपातळीवर

। मुंबई । महाईन्यूज ।

**प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्ली येथे होणाऱ्या संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ सहभागी व्हावा, यासाठी सतत आग्रही राहून, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याशी थेट बोलल्यानंतर सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ‘महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठे आणि स्त्रीशक्ती जागर’ चित्ररथावर साकारण्याचे काम दिल्ली येथे युद्धपातळीवर सुरु आहे.**




**»यावर्षीच्या चित्ररथ संकल्पनेत ‘साडेतीन शक्तिपीठे आणि स्त्रीशक्ती जागर’ यांची निवड करण्यात आली आहे. प्रजासत्ताक दिनी दिल्लीत कर्तव्य पथावर होणाऱ्या पथसंचलनाकडे देशवासीयांचे लक्ष लागलेले असते. पथसंचलनात सहभागी होणारे राज्य आणि मंत्रालये आपापल्या परीने उत्तमोत्तम संकल्पना निवडतात आणि कलाकार त्या संकल्पनांना मूर्त रूप देऊन, हुबेहूब साकारून पाहणाऱ्यांना मंत्रमुग्ध करतात. यावर्षी महाराष्ट्राच्या चित्ररथासाठी ‘साडेतीन शक्तिपीठे व स्त्रीशक्ती जागर’ या संकल्पनेची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रात आदिशक्तीची साडेतीन शक्तिपीठे प्रसिद्ध आहेत. या साडेतीन शक्तिपीठांमध्ये कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर, तुळजाभवानीचे श्री क्षेत्र तुळजापूर, माहूरची रेणुकादेवी आणि वणीची सप्तश्रृंगी देवी या धार्मिक स्थळांचा समावेश आहे. त्यामुळे या देवींच्या भव्य आणि तितक्याच सुंदर प्रतिमांचे आणि त्यांच्या माध्यमातून स्त्री सामर्थ्याचे दर्शन यावेळी सर्व देशवासियांना घरबसल्या होणार आहे.**

यावर्षीच्या चित्ररथ संकल्पनेत ‘साडेतीन शक्तिपीठे आणि स्त्रीशक्ती जागर’ यांची निवड करण्यात आली आहे. प्रजासत्ताक दिनी दिल्लीत कर्तव्य पथावर होणाऱ्या पथसंचलनाकडे देशवासीयांचे लक्ष लागलेले असते. पथसंचलनात सहभागी होणारे राज्य आणि मंत्रालये आपापल्या परीने उत्तमोत्तम संकल्पना निवडतात आणि कलाकार त्या संकल्पनांना मूर्त रूप देऊन, हुबेहूब साकारून पाहणाऱ्यांना मंत्रमुग्ध करतात. यावर्षी महाराष्ट्राच्या चित्ररथासाठी ‘साडेतीन शक्तिपीठे व स्त्रीशक्ती जागर’ या संकल्पनेची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रात आदिशक्तीची साडेतीन शक्तिपीठे प्रसिद्ध आहेत. या साडेतीन शक्तिपीठांमध्ये कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर, तुळजाभवानीचे श्री क्षेत्र तुळजापूर, माहूरची रेणुकादेवी आणि वणीची सप्तश्रृंगी देवी या धार्मिक स्थळांचा समावेश आहे. त्यामुळे या देवींच्या भव्य आणि तितक्याच सुंदर प्रतिमांचे आणि त्यांच्या माध्यमातून स्त्री सामर्थ्याचे दर्शन यावेळी सर्व देशवासियांना घरबसल्या होणार आहे.सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी हा चित्ररथ साकारण्यासाठी मूर्तिकार आणि कलाकारांना संधी दिली आहे. यावर्षीची संकल्पना, रेखाचित्रे व त्रिमितीय प्रतिकृती तुषार प्रधान आणि रोशन इंगोले या युवक मूर्तिकार आणि कलादिग्दर्शक यांनी तयार केली आहे. त्यांच्यासोबत ‘शुभ एड’ चे संचालक नरेश चरडे आणि पंकज इंगळे हे भव्य प्रतिकृतीचे काम सांभाळत आहेत.

---

## देशहितासाठी विरोधकांची एकजूट व्हावी; नितीश कुमार

। पाटणा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

“माझी स्वतःची काहीही इच्छा नाही. मला स्वतःसाठी काहीही नको आहे. विरोधी पक्षांनी एकजूट व्हावे आणि देशहितासाठी पुढे जावे, हेच मला हवे आहे,” असे स्पष्टीकरण बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी दिले.

तेलंगणचे मुख्यमंत्री आणि भारत राष्ट्र समिती (बीआरएस) या पक्षाचे प्रमुख के. चंद्रशेखर राव यांनी खम्ममध्ये आयोजित केलेल्या विरोधी पक्षांच्या एकत्रित सभेचे निमंत्रण नितीश कुमार यांना दिले नव्हते. याबद्दल यांना विचारले असता “ती त्यांची बैठक होती.

कोणी त्यांच्या पक्षाच्या बैठकीचे आयोजन करते आणि इतर लोकांना बोलाविले जाते, तर त्यात नवीन काय आहे, असा सवाल नितीश कुमार यांनी केला. माझी स्वतःची अशी कोणतीही इच्छा नाही. विरोधी पक्षाचे लोक एकत्र यावेत आणि देशहितासाठी त्यांनी पुढे जावे,’ एवढीच माझी इच्छा आहे.

चंद्रशेखर राव यांच्या निमंत्रणावरून देशातील प्रमुख विरोधी पक्षांचे नेते काल खम्ममधील संयुक्त सभेत सहभागी झाले होते. त्यांनी त्यात भाषणही केले. यामध्ये समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव, आम आदमी पक्षाचे प्रमुख व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन आणि डाव्या पक्षाचे नेते डी. राजा सहभागी झाले होते. राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेचा अंतिम टप्पा जवळ आल्याने काँग्रेसचे सर्व लक्ष यात्रेवर असल्याने त्यांचे नेते या बैठकीला उपस्थित नव्हते. देशात २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपला विरोध करणे एका समान उद्दिष्टाने काँग्रेस वगळता विरोधी पक्ष एकत्र येणे हे महत्त्वाचे पाऊल आहे.

## 'अग्निवीरां'ची बनावट भरती!

### माजी सैनिकानं घातला लाखोंचा गंडा

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्र सरकारनं तिन्ही सैन्य दलांमध्ये तरुणांना रोजगाराच्या संधी देण्यासाठी 'अग्नीवीर' योजना आणली. ही योजना वादाच्या भोवऱ्यातही अडकली होती. पण आता या भरतीमधील गैरप्रकार समोर आला आहे. अग्निवीरसाठीचं बनावट भरतीचं रॅकेट समोर आलं आहे. केरळच्या त्रिवेंद्रम इथं हा प्रकार घडला असून इथल्या मिलिटरी इंटेलिजन्सच्या माहितीनुसार, कोल्लम जिल्ह्यात राहणारा बिनू एम. नावाचा एक माजी सैनिक 'अग्नीवीर' भरतीचं बनावट रॅकेट चालवत होता. यासाठी त्यानं इंडियन आर्मीच्या नावानं केरळमधील २५ ते ३० जणांची नोकरीच्या आमिषानं फसवणूक केली. तसेच त्यांच्याकडून सुमारे ३० लाख रुपये उकळले आहेत.



'अग्नीवीर'ची पहिली बॅच नुकतीच बाहेर प्रशिक्षण घेऊन बाहेर पडली आहे. लष्करभरतीचं स्वप्न बाळगलेल्या तरुणांनी यासाठी सहा महिन्यांचं लष्करी प्रशिक्षण घेतलं आहे. यानंतर ते लष्करात विविध सेवांमध्ये रुजू झाले आहेत. मोदी सरकारसाठी 'अग्नीवीर' हा तरुणांचा रोजगाराचा प्रश्न सोडवणारा महत्वाचा कार्यक्रम आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अग्नीवीर योजना जाहीर केल्यानंतर ही तरुणांची दिशाभूल करणारी योजना असल्याचं सांगत त्यावर टीका होऊ लागली. त्यानंतर तिन्ही सैन्य दलांच्या प्रमुखांनी स्वतः पत्रकार परिषदा घेऊन ही योजना कशी चांगली आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला होता. तसेच विरोध करणाऱ्यांचे आरोपही खोडून काढले होते.

# ‘बांबू’ चित्रपटात तेजस्वी साकारणार अनोखी भूमिका



बहुगुणी अभिनेत्रीपासून सुरु झालेला तेजस्विनी पंडितचा प्रवास प्रस्तुतकर्तीपर्यंत पोहोचला आणि आता हा प्रवास आणखी पुढे गेला असून आता तिची ओळख एक यशस्वी निर्माती अशी झाली आहे. ‘अथांग’ सारख्या थरारक आणि सुपरहिट वेबसीरिजची निर्मिती केल्यानंतर आता तेजस्विनी नवीन वर्षात आपली पहिली फिचर फिल्म प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन आली आहे. काही दिवसांपूर्वीच ‘बांबू’चा ट्रेलर प्रदर्शित झाला आणि विशेष म्हणजे त्यात तेजस्विनीचीही झलक दिसली. त्यामुळे प्रेक्षकांना डबल धमाका अनुभवायला मिळणार आहे. विशाल सखाराम देवरुखकर दिग्दर्शित ‘बांबू’ चित्रपट येत्या २६ जानेवारी रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार असून या चित्रपटात अभिनय बेर्डे, वैष्णवी कल्याणकर, पार्थ भालेराव, शिवाजी साटम, अतुल काळे, समीर चौघुले, स्नेहल शिदम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. क्रिएटिव्ह वाईब प्रॉडक्शन निर्मित या चित्रपटाचे तेजस्विनी पंडित, संतोष खेर निर्माते आहेत. तर ‘बांबू’चे लेखन अंबर हडप यांनी केले आहे.

आपल्या पहिल्या चित्रपटाच्या निर्मितीबद्दल तेजस्विनी पंडित म्हणते, ”या टीमसोबत काम करण्याचा अनुभव खूप धमाल होता. त्यामुळे या चित्रपटाच्या प्रदर्शनाची मी आतुरतेने वाट पाहत आहे. अभिनेत्री म्हणून काम करताना आपली व्यक्तिरेखा कशी उत्कृष्टरित्या साकारली जाईल, यावर लक्ष केंद्रित केले जाते. मात्र निर्माती म्हणून काम करताना चहूबाजूकडे लक्ष द्यावे लागते. सतर्क राहावे लागते. चित्रपटाचा श्रीगणेशा झाल्यापासून ते चित्रपट प्रदर्शित होईपर्यंत निर्मात्याची जबाबदारी असते. किंबहुना चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरही अनेक गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते. पहिल्या वेबसीरिजच्या निर्मितीचा अनुभव होताच.

# ‘या’ दिवशी प्रदर्शित होणार ‘तू झूठी मैं मक्कार’चा ट्रेलर

लव रंजनच्या ‘तू झूठी मैं मक्कार’ने केवळ आपल्या अनोख्या टायटलमुळेच नव्हे तर रणबीर कपूर आणि श्रद्धा कपूरच्या धमाकेदार केमिस्ट्रीमुळेही प्रेक्षकांमधील उत्कंठा वाढवली आहे. अलीकडेच, या चित्रपटाचा टिझर रिलीज करण्यात आला, ज्याला पाहून या रोम-कॉम चित्रपटाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. अशातच, दर्शक प्रतीक्षा करत असतानाच, निर्मात्यांनी आज एका आकर्षक आणि कव्हर-फुल पोस्टरसह, चित्रपटाचा ट्रेलर 23 जानेवारी रोजी प्रदर्शित होणार असल्याचे जाहीर केले आहे. चित्रपटाचा नवीन पोस्टर रंगीत, मजेदार, आणि आकर्षक आहे. तसेच, हा चित्रपट लव रंजनचा आहे हे लक्षात घेता, चित्रपटाची कथा उत्तम असेल असा अंदाज लावला जात आहे. प्रेक्षकांनी ब्लू यूथ चित्रपटासाठी प्रतीक्षा केली असतानाच ‘तू झूठी मैं मक्कार’या सिनेमात एक असे जग पाहायला मिळेल ज्याच्याशी आजचे तरुण नक्कीच रिलेट करतील. अशातच, आता या चित्रपटाचा ट्रेलर 23 जानेवारी रोजी प्रदर्शित होणार असून, रणबीर आणि श्रद्धा लवकरच दर्शकांच्या भेटीला येतील.




# प्राजक्ताला सर्वोत्कृष्ट खलनायिकेचा पुरस्कार

मुंबईः सध्या महाराष्ट्राची क्रश कोण? असं विचारलं तर बिनदिक्तपणे एकच नाव समोर येतं. ते म्हणजे प्राजक्ता माळी. प्राजक्ता माळीची सध्या चलती आहे. आज तिने एका मानाच्या पुरस्कारावर नाव कोरलं.

प्राजक्ता माळीला पांडू या चित्रपटातील खलनायिकेच्या भूमिकेसाठी झी टॉकिजचा सर्वोत्कृष्ट खलनायिकेचा पुरस्कार मिळाला आहे.

हा पुरस्कार मिळाल्यानंतर प्राजक्ताने सोशल मीडियावर फोटो पोस्ट केले आहेत. पोस्टमध्ये प्राजक्ता म्हणते, "कष्टाचं चीज व्हायला सुरूवात झाली असं म्हणायला हरकत नाही...

असचं अविरत प्रेम आणि अखंड पाठिंबा आणि आशिर्वाद असू देत, हीच विनंती.

मला खलनायिका म्हणून काम करायला मिळेल असं कधीही वाटलं नव्हतं, त्यात हा पुरस्कार मिळाला..

त्यामुळे विशेष आनंद...

प्राजक्ता माळीला आज झी टॉकिजच्या वतीने सर्वोत्कृष्ट खलनायिकेचा पुरस्कार मिळाला. तिने पांडू सिनेमामध्ये खलनायिकेची भूमिका निभावली होती.

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या रानबाजार वेब सीरिजमध्ये प्राजक्ताने चक्क वेश्येची भूमिका केली होती. त्यामुळे तिने तिच्याच अभिनयाची रेषा मोडीत काढून एक वेगळा अंदाज दाखवून दिला होता. 'पांडू'मध्ये प्राजक्ताने पहिल्यांदाच खलनायिकेची भूमिका केली होती. नकारात्मक भूमिकेतूनही प्राजक्ताने अभिनयाची चुणूक दाखवून दिली होती. तिने साकारलेल्या या भूमिकेचं सर्वत्र कौतुक झालं. आज तिला त्याच भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट खलनायिकेचा पुरस्कार मिळाला.



# अमृता खानविलकर ठरली महाराष्ट्राची फेवरेट अभिनेत्री..

गेल्या वर्षभरात प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलेल्या मराठी सिनेमांची लोकप्रियता तर बॉक्स ऑफीससवरील कमाईत दिसलीच पण आता महाराष्ट्राला वेध लागले आहेत ते महाराष्ट्राची फेव्हरेट अभिनेत्री कोण हे जाणून घेण्याची. अखेर हे नाव समोर आलं आहे. झी टॉकीज वाहिनीतर्फे १५ डिसेंबरला महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण या पुरस्काराची नामांकने दणक्यात जाहीर झाली. यामध्ये महाराष्ट्राची फेव्हरेट अभिनेत्री कोण या विभागात अभिनेत्री अमृता खानविलकर, सोनाली कुलकर्णी, हृता दुर्गुळे, रितिका श्रोत्री आणि वैदेही परशुरामी यांच्यात चांगलीच चुरस रंगली. अखेर हा बहुमान अमृताला मिळाला आणि ती ठरली महाराष्ट्राची फेवरेट सर्वोत्कृष्ट अभिनेत्री..

अमृता खानविलकर हिची चंद्रमुखी या सिनेमातील चंद्रा ही भूमिका महाराष्ट्राची फेव्हरेट कोण या पुरस्कारासाठी नामांकन करण्यात आली होती. लेखक विश्वास पाटील लिखित चंद्रमुखी या कादंबरीवर बेतलेल्या या सिनेमातील अमृताची भूमिका तिच्या आयुष्यातील माइलस्टोन ठरली.

आजपर्यंत ग्लॅमरस अंदाजात दिसलेल्या अमृताने चंद्रमुखी ही व्यक्तिरेखा साकारत लावणी, तमासगीर कलावंतीणीचं आयुष्य, प्रेमासाठीची व्याकुळता दाखवण्यात सगळं कौशल्य पणाला लावलं. या सिनेमाने अमृताच्या अभिनय आणि नृत्यकलेचंही कौतुक झालं. त्यामुळे महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा किताब तिने पटकावला.

मराठी मनोरंजन विश्वात मानाचा समजला जाणारा महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण हा पुरस्कार सोहळा घेऊन यावर्षी पुन्हा एकदा झी टॉकीज ही वाहिनी रसिकांच्या भेटीला आली आहे. सिनेमा निर्मितीपासून सिनेमा प्रदर्शनापर्यंत आणि अनेक वैविध्यपूर्ण व प्रयोगशील कार्यक्रमाची नांदी सादर करणाऱ्या झी टॉकीज वाहिनीच्या पडदयावर काही दिवसांतच महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण पुरस्कार सोहळा प्रक्षेपित होणार आहे.



# अमनजोत कौरचा मोठा धमाका!

## पदार्पणाच्या सामन्यातच मोडला 9 वर्षांपूर्वीचा ‘हा’ विक्रम

**। वेस्ट इंडिज। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला क्रिकेट संघाला पुढील महिन्यात दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकात खेळायचे आहे. याआधी महिला संघ तिरंगी मालिका खेळत आहे, ज्यामध्ये त्यांचा पहिला सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळला. या सामन्यात स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने २७ धावांनी शानदार विजय नोंदवला. या सामन्यात आपला पदार्पणाचा सामना खेळणाऱ्या अमनजोत कौरने एक मोठ्या विक्रमाला गवसणी घातली.

फलंदाज अमनजोत कौरने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात पदार्पण केले. तिने ३० चेंडूत ४१ धावांची मॅचविनिंग खेळी खेळली. या कारणास्तव तिला सामनावीर म्हणूनही निवडण्यात आले. या सामन्यात दीप्ती शर्मानि अष्टपैलू कामगिरी केली. या सामन्यात भारतीय महिला संघाने ६ बाद १४७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकचा संघ ९ बाद १२० धावांच करु शकला.या सामन्यात भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. अमनजोत कौर क्रिजवर येईपर्यंत भारतीय संघ रुळावर आला नव्हता आणि निम्मा संघ तंबूत परतला होता. त्यावेळी धावफलकावर फक्त ६९ धावा होत्या. त्यानंतर दीप्ती शर्मा आणि अमनजोत कौरने संघाचा डाव सावरला. अमनजोत कौर पहिल्याच सामन्यात दमदार फलंदाजी करताना ३० चेंडूत नाबाद ४१ धावा केल्या.



### 7व्या क्रमांकावर 9 वर्षे जुना विक्रम मोडला

**» सातव्या क्रमांकावर येताना, कौरने तिच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय डावात ३- चेंडूंचा सामना केला आणि नाबाद ४१ धावा केल्या. तिच्या खेळीत ७ चौकारांचा समावेश होता. सातव्या क्रमांकावर किंवा त्याखालील क्रमांकावर असलेल्या कोणत्याही महिला फलंदाजाने केलेल्या सर्वोच्च धावसंख्येचा हा नवा भारतीय विक्रम आहे. यापूर्वी हा विक्रम झुलन गोस्वामीच्या नावावर होता, जो तिने २०१४ मध्ये केला होता. तिने ३८ धावा केल्या होत्या.**

### गोलंदाजीत देविका-दीप्तीची कमाल

**»फलंदाजीनंतर आफ्रिकन संघाची धुलाई करणाऱ्या दीप्ती शर्मांने गोलंदाजीची धुरा सांभाळली. तिन इथेही धमाका केला. ऑफस्पिनर दीप्ती शर्माने ४ षटकात ३० धावा देत ३ महत्त्वाचे बळी घेतले. तिच्याव्यतिरिक्त लेगस्पिनर देविका वैदने ३ षटकांत १९ धावा देत २ महत्त्वाचे बळी घेतले. आता भारतीय महिला संघाला २३ जानेवारीला वेस्ट इंडिजविरुद्धचा पुढील सामना खेळायचा आहे.**

---

# बॉर्डर गावसकर ट्रॉफीपूर्वी चेतेश्वर पुजाराची गर्जना

## प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये केला खास कारनामा

**।मेलबर्न। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**पुढील महिन्यात भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात चार कसोटी सामन्यांची बॉर्डर गावस्कर ट्रॉफी स्पर्धा खेळली जाणार आहे. या स्पर्धेपूर्वी चेतेश्वर पुजाराने शानदार कामगिरी केली आहे. त्याचे आंध्रविरुद्ध अवघ्या नऊ धावांनी शतक हुकले, पण या खेळीतून फॉर्मात असल्याचे संकेत दिले आहेत. त्याचबरोबर त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये १२,००० धावांचा टप्पा पूर्ण केला.**

३४ वर्षीय पुजाराने रणजी ट्रॉफीमध्ये आंध्रविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात मोठी कामगिरी केली आहे. चेतेश्वर पुजाराने शुक्रवारी रणजी ट्रॉफीमध्ये सौराष्ट्रकडून आंध्रविरुद्ध खेळताना, भारतातील प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये १२,००० धावा पूर्ण केल्या.

आंध्रविरुद्धच्या सामन्याच्या चौथ्या दिवशी चेतेश्वर पुजारा दुसऱ्या डावात शतकाच्या जवळ आला. पण नऊ धावांनी हुकले. त्याने १४६ चेंडूंचा सामना करत ९१ धावांची खेळी केली. पुजाराने आपल्या खेळीत ११ चौकार लगावले. त्याची ९१ धावांची खेळी व्यर्थ गेली. कारण सौराष्ट्राचा १५० धावांनी पराभव झाला.

पुजाराने शुक्रवारी रणजी ट्रॉफीमध्ये आंध्रविरुद्ध भारताच्या प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये १२,००० धावा पूर्ण केल्या. त्याने आपल्या १४५व्या सामन्यात ही कामगिरी केली आणि देशातील सरासरी ६० च्या खाली आहे. पुजाराने एकूण २४० प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने १८,४०० हून अधिक धावा केल्या आहेत. त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ५६ शतके आणि ७३ अर्धशतके केली आहेत.



### पहिल्या दोन कसोटींसाठी भारतीय संघ

**» रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), शुबमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, एस अय्यर, केएस भरत (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), आर अश्विन, अक्षर पटेल , कुलदीप यादव , रवींद्र जडेजा , मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, उमेश यादव, जयदेव उनाडकट, सूर्यकुमार यादव**

# सामन्याच्या तिकिटांच्या काळ्याबाजारावर उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

**।मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना २१ जानेवारी रोजी रायपूर येथे खेळवला जाईल. त्याचवेळी, या मालिकेतील तिसरा एकदिवसीय सामना २४ जानेवारीला इंदूर होळकर क्रिकेट स्टेडियम इंदूरवर होणार आहे. मात्र सामन्यापूर्वी तिकिटांच्या काळाबाजारावरून निर्माण झालेल्या वादावर उच्च न्यायालयाने मोठा निकाल दिला आहे. वास्तविक, तिकिटांच्या ऑनलाइन विक्रीतील अनियमिततेबाबतची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.

याचिकाकर्ते राकेश सिंह यादव यांनी बीसीसीआय आणि एमपी बोर्ड क्रिकेट असोसिएशनच्या विरोधात एक जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेमध्ये इंदूरमध्ये होणाऱ्या सामन्याच्या तिकिटांच्या ऑनलाइन विक्रीमध्ये गैरव्यवहार आणि काळाबाजार झाल्याचा आरोप केला होता. हे आरोप फेटाळत एमपी क्रिकेट बोर्डाने उच्च न्यायालयात दाद मागितली होती.

उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठाचे न्यायमूर्ती एसए धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती प्रकाशचंद्र गुप्ता यांनी दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ग्राह्य धरून १८ जानेवारी रोजी याचिका फेटाळून लावली. निकाल देताना न्यायालयाने म्हटले आहे की,“प्रतिवादींवर लावण्यात आलेल्या आरोपांची सत्यता पडताळून न पाहता याचिकाकर्त्याने जनहित याचिका दाखल केली आहे.” त्यामुळे न्यायालयाचा वेळ वाया गेला. तसेच त्यांनी आपल्या आरोपांच्या समर्थनार्थ कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. केवळ लोकप्रियता मिळवण्याच्या उद्देशाने ही याचिका दाखल करण्यात आली आहे.

### उच्च न्यायालयाने हा निर्णय दिला

**» भारत आणि न्यूझीलंड यांच्यात २६ जानेवारी रोजी इंदूर येथे होणाऱ्या वनडे सामन्याच्या तिकिटांच्या ऑनलाइन विक्रीतील अनियमिततेबाबत दाखल करण्यात आली होती. ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठाने याचिकाकर्त्याला न्यायालयाचा वेळ वाया घालवल्याबद्दल २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. या व्यक्तीने लोकप्रियता मिळविण्यासाठी हे सर्व केले, तेही कोणतेही पुरावे सादर न करता केले, असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे.**